378

महाराष्ट्र पोलीस

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक ३१/०७/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग,शासन निर्णय क्र.बांधका-०१२१/प्र.क्र.१५/पोल-७ दिनांक ३० जुलै, २०२४.

**विषय :-** पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्या अधिपत्याखालील मौजे बऱ्हाणपूर, तालुका-बारामती, जिल्हा-पुणे येथील पोलीस उप-मुख्यालय निवासी व अनिवासी इमारतींच्या बांधकामास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.बांधका-०१२१ / प्र.क्र.१५ / पोल-७, दिनांक ३० जुलै, २०२४. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०७३०१६५३३१७८२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परिक्षेत्रीय, कोल्हापूर.
पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पुणे.
सहायक पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यासन अधिकारी, का.क्र. २७

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "वित्त व लेखा" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्या अधिपत्याखालील मौजे बऱ्हाणपूर, तालुका- बारामती, जिल्हा-पुणे येथील पोलीस उप-मुख्यालय निवासी व अनिवासी इमारतींच्या बांधकामास सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः बांधका-०१२१/प्र.क्र.१५/पोल-७**
दुसरा मजला, मंत्रालय मुख्य इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२
तारीख: ३० जुलै, २०२४

वाचा :-

१) **शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांकः** विअप्र-२०१४/प्र.क्र.४९/१४/विनियमन, दिनांक ०५ जानेवारी, २०१५
२) **शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांकः** विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियमन, भाग-२, दिनांक २० सप्टेंबर, २०१९.
३) **शासन परिपत्रक, सार्वजनिक बांधकाम विभाग, क्रमांकः** संकिर्ण-२०१९/प्र.क्र.१०/इमा-२, दिनांक २५ सप्टेंबर, २०१९.
४) **शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांकः** पीओएस-०८२०/प्र.क्र.४१/पोल-३, दिनांक २८ ऑगस्ट, २०२०.
५) **पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाचे पत्र क्रमांकः** पोमसं/२७/पो. अ. पुणे-ग्रा-बऱ्हाणपूर/ निवा-व-अनिवा.बांध/७४/२०२०, दिनांक १५ जानेवारी, २०२१.
६) **पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाचे पत्र क्रमांकः** पोमसं/२७/बऱ्हाणपूर इमा. बांध. सुधारित प्रशा. मान्यता/ ०८/२०२४, दिनांक ०७ मे, २०२४.
७) **शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांकः** व्यअस-२०२२/प्र.क्र.१२०/अर्थसंकल्प-२, दिनांक १९ ऑक्टोबर, २०२२

८) **शासन पत्र, वित्त विभाग क्रमांकः** व्यअस-२०२४/प्र.क्र.६१/अर्थ-२, दिनांक ११ जुलै, २०२४ (व्यय अग्रक्रम समितीच्या बैठकीचे इतिवृत्त)

**प्रस्तावना :-**

पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्या कार्यक्षेत्रातील मौजे बऱ्हाणपूर, तालुका बारामती, जिल्हा पुणे येथे कायदा व सुव्यस्थेच्या दृष्टीने पोलीस उप-मुख्यालय स्थापन करण्यास संदर्भाधीन क्रमांक ३ येथील दिनांक २८ ऑगस्ट, २०२० च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार मौजे बऱ्हाणपूर, बारामती, पुणे येथील पोलीस उप-मुख्यालयाच्या इमारतीच्या बांधकामास गृह विभागाच्या दिनांक ०५/०३/२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये रक्कम रुपये १४२.६२ कोटीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती.

मौजे बऱ्हाणपूर, तालुका बारामती, जिल्हा पुणे येथील पोलीस उप-मुख्यालय कार्यान्वित करण्यासाठी कार्यालयीन कामकाजाकरिता प्रशासकीय इमारत, महिला व पुरुष प्रशिक्षणार्थींकरिता वसतीगृहे, कवायत मैदान, मुख्यालयास भेट देणारे वरिष्ठ अधिकारी यांच्याकरिता विश्रांतीगृह तसेच वास्तव्यास असणारे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्याकरिता निवासस्थान आवश्यक असल्याने दिनांक ०१ जुलै, २०२० रोजी मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे झालेल्या बैठकीमध्ये सुधारित प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या.

त्यानुसार, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या कार्यालयाकडून दिनांक १९ ऑक्टोबर, २०२२ च्या पत्रान्वये सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला होता. सदर प्रस्ताव वित्त विभाग तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या सहमतीकरिता पाठविण्यात आला होता. सार्वजनिक बांधकाम विभाग व वित्त विभागाने दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने सदर प्रस्ताव दिनांक ०३ जुलै, २०२४ रोजीच्या मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांच्या अध्यक्षतेखालील व्यय अग्रक्रम समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला असता, व्यय अग्रक्रम समितीने मौजे बऱ्हाणपूर, तालुका बारामती जिल्हा पुणे येथील पोलीस उपमुख्यालयाच्या इमारतीच्या बांधकाच्या रक्कम रुपये १६७.५०२२ कोटी किंमतीच्या सुधारित प्रशासकीय अंदाजपत्रकास मान्यता दिली आहे.

## शासन निर्णय :-

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी शासनास सादर केलेल्या प्रस्तावानुसार व मा. उपमुख्यमंत्री, वित्त यांच्या अध्यक्षतेखालील व्यय अग्रक्रम समितीने दिनांक ०३ जुलै, २०२४ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण यांच्या कार्यक्षेत्रातील मौजे बऱ्हाणपूर, तालुका बारामती, जिल्हा पुणे येथील पोलीस उप-मुख्यालय इमारत व सेवानिवासस्थाने यांच्या बांधकामासाठी रक्कम रुपये १६७.५०२२ कोटी एवढ्या किंमतीच्या अंदाजपत्रकास खालील नमूद बाबींकरिता त्याखाली नमुद अटी व शर्थींच्या अधीन राहून सुधारित प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | विवरण | सुधारित परिमाण | सुधारित किंमत |
|---|---|---|---|
| 1 | Construction of Building | 35790 Sqm | 789,150,789.00 |
| 2 | Rain/ Roof Water Harvesting | -- | 4,512,547.00 |
| 3 | Furniture | -- | 81,147,345.66 |
| 4 | Water Supply and Sanitary works including STP | -- | 66,96,102.00 |
| 5 | Electrification Internal | -- | 61,713,106.08 |
| 6 | Electrification External | -- | 45,635,260.86 |
| 7 | Fire Fighting Arrangements etc. | -- | 20,614,787.89 |
| 8 | Compound and Entrance Gate | 867.79 RMT X 15000 rate | 13,016,794.00 |
| 9 | Internal Roads | -- | 40,382,672.00 |
| 10 | Land Scaping | -- | 10,311,807.00 |
| 11 | Soil Investigation and detail land survey | -- | 850,912.00 |
| 12 | Divider Wall, CD work, RCC, Roadside Gutter, pathways/ footpath | -- | 76,579,094.00 |
| 13 | Development of Ground-Cutting, filling, leveling | -- | 32,559,834.00 |
| 14 | Killa wall as per design 90 M Length | -- | 12,100,216.00 |
| 15 | Flag post with salute base (100 sqm) and viewing gallery (500 sqm) | -- | 9,881,800.00 |
| 16 | Parade ground and play ground development | -- | 13,288,368.00 |
| 17 | Transformer Room | -- | 5,328,866.00 |
| 18 | Air Conditioning | -- | 5,002,267.85 |
| 19 | Lift | -- | 2,874,640.08 |

| अ.क्र. | विवरण | सुधारित परिमाण | सुधारित किंमत |
|---|---|---|---|
| 20 | External Toilets | -- | -- |
| 21 | AB Room, Area Lighting, Pumps, Generator | -- | 16,193,610.92 |
| 22 | CCTV | -- | 6,741,317.00 |
| 23 | Gardening/ Plantation | -- | 2,387,191.00 |
| 24 | Contingencies | -- | 31,566,031.56 |
| 25 | Contingencies on Civil Landscaping | -- | -- |
| 26 | GST 12 % on Civil + Electrical upto 12/07/2021 | 12% | 52,685,353.00 |
| 27 | GST 18 % on Civil + Electrical upto 30/07/2022 | 18% | 126,953,233.00 |
| 28 | Price Escalation | -- | 68,065,168.95 |
| 29 | Architect Fee 2% on (P) | 18.00 % | 22,31,254.00 |
| 30 | GST on Architect Fee 18% on D (iii) | -- | 4,017,105.72 |
| 31 | Additional Insurance 0.5% (P) | 1% | 6,586,171.65 |
| 32 | Additional GST 18% on Furniture (A) 1(a) (f) | -- | -- |
| 33 | Additional Royalty charges | -- | 3,157,387.00 |
| 34 | Additional Control Testing Charges | -- | 2,440,100.00 |
| 35 | Electrification as per AA Order | -- | 184,964,722.00 |
| 36 | Centage Charges | -- | 40,000,000.00 |
| **Total** | | | **1,675,022,134.00** |

**वरील बाबींसाठी देण्यात आलेली सुधारित प्रशासकीय मान्यता ही पुढील अटी व शर्थींच्या अधीन राहून देण्यात येत आहे :-**

१) मौजे बऱ्हाणपूर, तालुका बारामती जिल्हा पुणे येथील पोलीस उप-मुख्यालयाच्या बांधकामासाठी देण्यात आलेली सुधारित प्रशासकीय मान्यता ही उपलब्ध होणाऱ्या निधीच्या मर्यादेत देण्यात येत आहे. त्यामुळे वाढीव कामाचे प्रत्यक्ष प्रकल्पांतर्गत कार्यादेश देखील निधीची उपलब्धता झाल्यानंतरच देण्यात यावेत.

२) राज्य शासनाकडून वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या मार्गदर्शक सूचनांनुसार व निर्देशांनुसार प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात यावी.

३) प्रकल्पाचे काम नियोजित वेळेत व सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या तरतूदींच्या मर्यादेत पूर्ण करण्यात यावे.

४) आर्थिक दायित्व निर्माण होईल अशा नविन घटकांचा शासन मान्यतेशिवाय समावेश करु नये.

५) सुधारित प्रशासकीय मान्यतेनुसार प्रकल्पातील कामांची अंमलबजावणी करताना दर्जा व गुणवत्ता उत्कृष्ट राहील याची जबाबदारी अंमलबजावणी यंत्रणेची राहील.

६) सदर प्रकल्पासाठी कोणत्याही प्रयोजनार्थ मंजूर सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेबाहेर जाऊन, अतिरिक्त खर्च करता येणार नाही.

७) प्रकल्पांतर्गत सामुग्रीची आवश्यकता/ मागणी याची अंमलबजावणी यंत्रणेने खातरजमा करावी व तदनंतरच या बाबींच्या खरेदीसाठी आवश्यक ती प्रक्रिया राबविण्यात यावी.

८) या सामुग्रीचे विनिर्देश (Specifications) गरजेनुसार व अद्ययावत असल्याची खात्री करण्यात यावी.

९) खरेदी करावयाच्या बाबींचे तांत्रिक विनिर्देश (Technical Specifications) तज्ञांनी मान्य केलेल्या विनिर्देशानुसारच असावेत. तसेच सदर तांत्रिक विनिर्देश हे कोणत्याही विशिष्ट कंपनीला फायदा होतील, अशा रीतीने नसल्याची खात्री करावी व त्यानंतरच खरेदी करण्यात यावी.

१०) खरेदी करण्यात येणाऱ्या बाबींची पुरवठ्याअगोदर व पुरवठ्यानंतर नमुना तपासणी (Pre/ Post-dispatch random sample inspection) करुन उचित व योग्य विनिर्देश असलेल्या वस्तुंचीच खरेदी करण्यात येईल, याची खात्री करण्यात यावी.

११) प्रकल्पांतर्गत खरेदीवर व अन्य बाबींबर होणारा खर्च मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

१२) प्रकल्पांतर्गत सामुग्रीच्या खरेदीची द्विरुक्ती (Duplication) होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

१३) प्रकल्पांतर्गत बाबींची खरेदी प्रक्रिया राबविताना केंद्रीय दक्षता आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

१४) या प्रकल्पांतर्गत उपलब्ध करुन देणाऱ्या निधीच्या विनियोगाचे उपयोगिता प्रमाणपत्र अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी शासनास सादर करावे.

१५) प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर त्याबाबतचे प्रमाणपत्र (Completion Certificate) अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी शासनास त्वरित उपलब्ध करुन द्यावे

१६) सदर प्रकल्पाच्या खर्चाचे अंदाज हे सक्षम प्राधिकारी यांनी साक्षांकित करणे आवश्यक राहील.

१७) मूळ प्रशासकीय मान्यतेच्या आदेशामधील इतर अटी व शर्थी कायम राहतील.

या प्रयोजनासाठी येणारा खर्च हा "गृह विभाग- मागणी क्रमांक बी-१, ४०७०, इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च, (००) ५१ बांधकामे, ८०० इतर खर्च (००) (००) (११) महाराष्ट्र राज्य पोलीस विभागाच्या कार्यालयीन इमारतींचे बांधकाम करणे (४०७० ०२११) (कार्यक्रम), ५३- मोठी बांधकामे" या लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या अनुदानामधून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०७३०१६५३३१७८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

CHETAN BALASAHEB NIKAM

Digitally signed by CHETAN BALASAHEB NIKAM
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=946f8eff01148466e26f8d80863da34d0a26661f5eefb602c359549d8ed4511e, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7268DE40660971F80951C66D0E657E903B378196F51A978D2A366CF5EB564C0C, cn=CHETAN BALASAHEB NIKAM
Date: 2024.07.30 17:22:32 +05'30'

**(चेतन निकम)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. उपमुख्यमंत्री, गृह यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

२. मा. उपमुख्यमंत्री, वित्त यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६. अपर पोलीस महासंचालक (नि व स), पोलीस महासंचालक यांचे कार्यालय, मुंबई.
७. अपर पोलीस महासंचालक, पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. विशेष पोलीस महानिरिक्षक, कोल्हापूर परिक्षेत्र, कोल्हापूर.
९. पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पुणे.
१०. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रदेश, पुणे.
११. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१२. महालेखापाल ½ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखापरिक्षा), महाराष्ट्र (मुंबई/ नागपूर)
१३. उप सचिव (अर्थसं-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
१४. उप सचिव (व्यय-७/ विनियम), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५. निवडनस्ती (कार्यासन पोल-७)